ढोल

एक
भारतीय लोककथा



संकलन: रॉब क्लेवलंड

चित्र: टॉम व्रेन

मराठी अनुवाद: सानिया

ढोल

एक भारतीय लोककथा



खूप खूप वर्षांपूर्वी एका गावामध्ये एक गरीब बाई राहायची. तिचा एकुलता एक मुलगा खूप गुणी होता. आईला मदत करायला तो नेहमीच तत्पर असे. त्यांचं आयुष्य फारच खडतर होतं. पण आई आणि मुलाला एकमेकांचा आधार होता. मुलाचे कपडे फटके होते. त्याच्याकडे अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकीच खेळणी होती. पण तरीही तो समाधानी होता.



मुलाला फक्त एकच गोष्ट हवीहवीशी वाटायची...ढोल!



एके दिवशी आई धान्य विकण्यासाठी गावच्या बाजारात जाणार होती. निघताना तिने मुलाला विचारलं, "बाजारातून तुझ्यासाठी काय घेऊन येऊ?"

मुलाने थोडा विचार केला आणि मग म्हणाला, "आई, तू माझ्यासाठी एखादा ढोल आणलास तर मला खूप आवडेल. पण मला माहीत आहे की ढोल विकत घेणं आपल्याला परवडणार नाही."



मुलाचं बोलणं खरंच होतं. ढोल विकत घ्यायची त्यांची अजिबातच ऐपत नव्हती. जे काही थोडसं धान्य ते उगवायचे ते विकून त्यांना फारच कमी पैसे मिळत. रोजच्या जगण्यासाठी लागणाऱ्या मोजक्या वस्तू विकत घेण्यातच ते पैसे संपून जायचे.



बाजारातून घरी येताना त्या गरीब बाईच्या मनात सारखे मुलाचेच विचार येत होते. त्याला हवी असणारी वस्तू आपण त्याला देऊ शकत नाही याचं तिला खूप वाईट वाटत होतं.
विचार करता करता तिला एकदम रडू कोसळलं. डोळे पुसत ती हळू हळू पावलं टाकू लागली. आपल्याच तंद्रीत चालत असताना रस्त्याच्या कडेला बसलेल्या माणसाकडे सुरुवातीला तिचं लक्षच गेलं नाही.



"काय झालं मुली? तू का बरं रडते आहेस?" त्या बुटक्या अनोळखी माणसाने विचारलं. बाईने त्याला सगळी हकीकत सांगितली.



त्या अनोळखी माणसाने बाईला एक काठी दिली. "ही काठी तुझ्या मुलाला दे. हिच्यामध्ये जादूचा अंश आहे."
"ही काठी कदाचित माझ्या गुणी बाळाला उपयोगी पडेल." बाईने विचार केला.



घरी पोचल्यावर बाईने मुलाला काठी दिली आणि त्या अनोळखी माणसाबद्दल सांगितलं. काठीचा उपयोग कसा होईल हे काही मुलाला कळलं नाही. त्याने आईचे आभार मानले आणि तो लगेच खेळायला पळाला.



वाटेत मुलाला एक म्हातारी बाई दिसली. भाकऱ्या करण्यासाठी तिला चूल पेटवायची होती. पण तिने गोळा केलेली लाकडं खूपच ओली होती. ती काही केल्या पेट घेत नव्हती.



तिच्या चुलीतून काळा धूर येत होता. धुरामुळे तिचे डोळे चुरचुरू लागले.
“काय झालं? तुम्ही इतक्या उदास का आहात?” मुलाने विचारलं.
“माझी चूल पेटत नाहीये.” बाई रडत रडत म्हणाली.



“हे घ्या.” मुलाने आपल्या हातातली काठी बाईला दिली. “माझी आई म्हणाली की ही काठी जादुई आहे. या काठीने तुमची चूल नक्कीच पेटेल.”



वाळलेल्या काठीमुळे चुलीने लगेच पेट घेतला. मुलाचे आभार मानताना म्हाताऱ्या बाईने त्याला चुलीवरची गरमागरम भाकरी दिली.



भाकरी हातात घेऊन मुलगा चालू लागला. रस्त्यात त्याला कुंभाराची बायको दिसली. तिच्या कडेवर तान्हं बाळ होतं. बाळाने जोरात भोकाड पसरलं होतं. त्याचं रडणं थांबायचं नावच घेत नव्हतं.



"बाळ का बरं रडतंय?" मुलाने मोठ्या आवाजात विचारलं.



"बाळाला खूप भूक लागलीये. पण त्याला खायला द्यायला माझ्याजवळ काहीच नाहीये." कुंभाराची बायको म्हणाली.

मुलाने आपल्या हातातली भाकरी भुकेल्या बाळाला देऊन टाकली.



गरमागरम भाकरी पोटात गेल्याबरोबर बाळाचं रडणं थांबलं. खुश झालेल्या बाळाच्या आईने मुलाला एक मोठं मातीचं मडकं भेट म्हणून दिलं.



त्यानंतर मुलगा नदीवर गेला. नदीकिनारी त्याला एक बाई आणि एक पुरुष एकमेकांवर मोठमोठ्याने ओरडताना दिसले. “काय झालं? तुम्ही का भांडत आहात?” मुलाने विचारलं.




"मी एक धोबी आहे." माणूस म्हणाला. "आमच्याकडे असलेलं एकमेव मडकं आता माझ्या बायकोच्या हातून फुटलं. मडक्यात गरम पाणी घेऊन मी त्यात कपडे भिजत टाकायचो. आता तूच सांग, मडक्याशिवाय मी कपडे कसे बरं स्वच्छ करू?"



मुलाने लगेच आपल्याजवळचं मडकं धोब्याला दिलं आणि त्याची अडचण दूर केली.

"धन्यवाद!" धोबी म्हणाला आणि त्याने मुलाला एक छानसा कोट भेट दिला.



थोड्या वेळानंतर मुलाला रस्त्यात एक माणूस आणि घोडा दिसला. माणसाच्या अंगात फक्त एक छोटी चड्डी होती. त्याचे केस ओलेचिंब होते. उघडाबंब माणूस थंडीने कुडकुडत होता.



"तुमचे कपडे कुठे गेले? तुम्ही ओले कसे झालात?" मुलाने विचारलं.
"मी माझ्या घरी जात असताना एक डाकू ह्या घोड्यावरून आला. त्याने मला कपडे उतरवायला सांगितलं आणि माझ्याकडचे सगळे पैसे हिसकावून घेतले. मला नदीत ढकलून तो पसार झाला." माणसाने त्याला आपली हकीकत सांगितली.



धोब्याने दिलेला कोट मुलाने त्या माणसाला दिला. "हे घ्या. हा कोट घातल्यावर तुमच्या अंगात जरा ऊब येईल."
माणसाने कोट अंगात चढवला आणि मुलाचे आभार मानले. "हा घोडा तुला माझ्याकडून भेट. तसाही मला आता ह्याचा काहीच उपयोग नाहीये."



घोडा घेऊन मुलगा चालू लागला. वाटेत त्याला एक लग्न समारंभ दिसला. मांडवात नवरा मुलगा, त्याचे नातेवाईक आणि व-हाडी मंडळी होती. सोबत वाजंत्रीही होते. पण ते गाणी वाजवत नव्हते.



सगळेजण दुःखी चेहऱ्याने झाडाच्या सावलीत बसले होते. "काय झालं? तुम्ही सगळे इतके उदास का आहात?" मुलाने विचारलं.



नवऱ्या मुलाचे वडील कपाळाला आठ्या घालत म्हणाले, "अजून वरातीतला घोडा आला नाही. बराच वेळ झाला आम्ही घोडेवाल्याची वाट बघतो आहोत. नवऱ्या मुलाने वरातीत घोड्यावरून न येणं अपशकून मानला जातो."



त्यांचं बोलणं ऐकून मुलाने लगेचच आपल्याजवळचा घोडा त्यांना देऊ केला.

"केवळ तुझ्यामुळे आज आमची नामुष्की टळली." नवरा मुलगा आनंदाने म्हणाला.



नवऱ्या मुलाने आपल्या वडिलांशी आणि वाजंत्रीवाल्यांशी थोडी चर्चा केली आणि एक छानसा ढोल मुलाला दिला.

"तुझे आभार कसे मानावेत मला समजत नाहीये." तो म्हणाला.

"आमच्याकडून तुला ही छोटीशी भेट."



ढोल बघताच मुलाचा चेहरा आनंदाने उजळला. "खूप खूप धन्यवाद! मला सर्वात हवीहवीशी वाटणारी वस्तू तुम्ही मला दिलीत. तुम्हाला लग्नासाठी खूप शुभेच्छा!"



उड्या मारत मारत मुलगा घराच्या दिशेने पळत सुटला. कधी एकदा आईला सगळं सांगतोय असं त्याला झालं होतं. त्याला आईला सांगायचं होतं की त्या अनोळखी बुटक्या माणसाचं म्हणणं अगदी खरं होतं.



त्या छोट्याशा काठीत खरंच जादू होती!

समाप्त